# प्रेसनोट

दि.२४/०३/२०२२

## शिरूर येथील उप कोषागार अधिकाऱ्यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | शिरूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक – रमेश काशिनाथ घोडे, वय – ४७ वर्षे,<br>पद - उप कोषागार अधिकारी, वर्ग २, उप कोषागार कार्यालय ता. शिरूर, जि.पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- (दहा हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ९,०००/- (नंऊ हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- २४/०३/२०२२.
ठिकाण :- उप कोषागार अधिकारी कार्यालय, शिरूर

थोडक्यात माहिती :- तक्रारदार यांचे वडील शासकीय नोकर असून तक्रारदार यांचे आईचे वैद्यकीय उपचाराचे बिल उपकोषागार कार्यालय शिरूर येथे मंजुरी करीता दिले होते. सदरचे वैद्यकीय बिल मंजुर करण्यासाठी लोकसेवक घोडे यानी बिलाच्या १० टक्के - २९,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.विभागास दिली.

सदर तक्रारीचीं पडताळणी केली असता तक्रारदार यांच्या आईचे वैद्यकीय बिल मंजुर करून देण्यासाठी आरोपी लोकसेवक यानी १० हजार रूपयाची लाच मागणी करून ०९ हजार रूपयांची लाच स्वीकारली म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक शितल घोगरे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.